**<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. १२/२०१६ मधील नि. ११ वरील आदेश</u>.**

{CNR No.MHAH230000942016}

**१.** अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** अर्जदार यांनी अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण अर्जदाराचे युक्तीवादासाठी नेमलेले आहे, परंतु अर्जदारांनी मुळ अर्जात भु संपादन कायदयाप्रमाणे मिळणारे व्याज व जमीन बागायत असल्याचे कथन करुन त्याप्रमाणे वाढीव नुकसान भरपाई मिळावी म्हणून अर्ज दाखल केला आहे. परंतु, नजरचुकीने अर्जदाराकडुन पुरावा बंद केल्याची पुरसिस दिली गेली आहे. अर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे, अर्जदारास संपादित झालेल्या मिळकतीचा सात बाराचा उतारा पाहुन पुरावा दयायचा आहे. त्यामुळे अर्जदाराच्या हितासाठी व न्यायाचे दृष्टीने झालेला पुरावा बंद आदेश रद्द होवून मिळावा अशी अर्जदाराची विनंती आहे.

**३.** सामनेवाला यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. त्यांचे कथनानुसार, अर्ज खरा व बरोबर नाही. अर्जदारांनी कोणताही पुरावा न देता पुरावा बंद केल्याचे दिसून येते. त्यामुळे योग्य तो आदेश करण्याची सामनेवाला यांनी विनंती केली आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन करता, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज भु संपादन कायदा १८९४ कलम २८(अ)(३) प्रमाणे वाढीव नुकसान भरपाईकामी दाखल केला असून मुळ अर्जातील नमूद कथनानुसार, सामनेवाला यांचेतर्फे पारित करण्यात आलेला निवाडा हा योग्य नसल्याचे त्यांचे कथन आहे. अशा परिस्थितीत, मुळ अर्जाचा निर्णय गुणदोषावर होण्यासाठी अर्जदारांतर्फे त्यांचे कथनास पुष्टी देणारा पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.११) येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नेमलेल्या तारखेस अर्जदार यांनी न चुकता त्यांचा पुरावा सादर करण्याबाबत आदेशित करण्यात येत आहे.

श्रीगोंदा.
दिनांक २३/११/२०२३.

**( ए.एन. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.